# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 03/03/2023 (शुक्रवार) दुपार

---

### पो.स्टे. कळमेश्वर हद्दीमधील बाजार चौक येथील जुगार अड्डयावर धाड
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक ०२/०३/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कळमेश्वर टाऊन मध्ये काही इसम हे ऑनलाईन लॉटरी Lucky win या प्रकारचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने बाजार चौक कळमेश्वर येथे सापळा रचुन छापा टाकुन आरोपी नामे— १) सतिश वसंतराव भुसारी, वय ३३ वर्ष, रा. वार्ड नं. ०६, पारडी खैरी कळमेश्वर २) आरूष सुरेश उईके, वय २५ वर्ष, रा. वार्ड नं. १२ ब्राम्हणी फाटा कळमेश्वर हे लोकांकडुन पैसे घेवुन संगणकावर ऑनलाईन लॉटरी Lucky win या प्रकारचा जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०२ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) दोन संगणक संच किंमती अंदाजे ३०,०००/—रू.
२) दोन प्रिंटर/टिकीट मशिन किंमती अंदाजे १०,०००/—रू.
३) इलेक्ट्रिक कॉइन बॉक्स मशीन १० नग किमती अंदाजे १,२०,०००/—रू.
४) जीयो कंपनीचा इंटरनेट वायफाय राउटर किमती अंदाजे २,०००/—रू.
५) नगदी रोख रक्कम १६२०/—रू.
६) ऑनलाईन लॉटरी रीसीप्ट ३७ नग
असा एकुण किंमती अंदाजे १,६३,६२०/—रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक पाली मो. नं ९२८४३५४६३० पोलीस ठाणे कळमेश्वर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक यशंवत सोळसे, सहायक फौजदार चंद्रशेखर घडेकर, पोलीस हवालदार दिनेश अधापुरे, पोलीस शिपाई आशुतोष लांजेवार स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण, पोलीस हवालदार प्रमोद तभाने, पोलीस शिपाई निलेश पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर